# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./२२२ /२०२३-२४ दिनांक :०३/ ०५ /२०२३.

प्रति,
१. जनसंपर्क अधिकारी
२. सिस्टम मॅनेजर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा रोड येथील मॅमोग्राफी मशीन हाताळण्याकामी **मॅमोग्राफी तंत्रज्ञ** या पदाची मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पद भरणेकामी मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

तरी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहिरातीचा मसुदा जोडलेला आहे.

**(डॉ.नंदकिशोर लहाने)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ २९४ /२०२३-२४ दिनांक:- ०२/०४ /२०२३.

## // जाहिरात //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे मॅमोग्राफी तंत्रज्ञ या पदावर मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा रोड येथील मॅमोग्राफी मशीन हाताळण्याकामी मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करणेकामी **मॅमोग्राफी तंत्रज्ञ** या पदाची जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत.

खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि.१०/०४/२०२३ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने सार्वजनिक आरोगय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१ येथे अर्ज सादर करावा. पात्र उमेदवारांची प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन पदे आवश्यकतेनुसार खालील नमुद अटींशर्तींच्या अधिन राहून प्रारुप यादीमधून मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आवश्यतेनुसार नेमणूक करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | मासिक मानधन (मानद तत्वावर) | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| २. | मॅमोग्राफी तंत्रज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची Bs. in Paramedical Technology (Radiography) या शाखेची पदवी.<br>२) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालय/डायग्नॉस्टिक सेंटर मधील संबधित कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. २५,०००/- | १ |

उपरोक्त पदांकरीताच्या अटी-शर्ती व अर्जाचा नमुना याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mbmc.gov.in यांवर भेट द्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

(संजय शिंदे)
उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननीअंती प्रारुप गुणवत्ता (Draft List) यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महानगरपालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधून **मानद तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२. सदर जाहिरातील पदसंख्या अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असतील.

३. वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत.

४. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यांत येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दूरध्वनीवर करण्यांत येऊ नये.

५. वरील पदे ही संपुर्णपणे मानद तत्वावर कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

६. निवड झालेल्या उमेदवाराने पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

७. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (True copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

८. प्रारुप गुणवत्ता यादीमधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवाराने नियुक्ती आदेश दिल्यानंतर ०३ दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील.

९. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / वैद्यकीय अधिक्षक, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरा रोड प्रमुख यांना राहतील.

१०. सदर पदांना दररोज किमान आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल. तथापि, अत्यावश्यक सेवा असल्याने आवश्यकतेप्रमाणे जादाचे कामकाज करावे लागेल व त्याचे अतिरिक्त मानधन अदा करण्यात येणार नाही. पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

११. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. सदरची नियुक्ती ही मानद तत्वावर तात्पुरत्या स्वरुपाची असेल. महानगरपालिकेस आवश्यता नसलयास सदरची नियुक्ती कोणत्याही पूर्वसुचना किंवा त्यासाठी १ महिन्याची नोटीस न देता संपुष्टात आणली जाईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१३. निवड झालेल्या उमेदवारास मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही. तसेच कोणत्याही न्यायालयात याबाबत दावा दाखल करता येणार नाही. तसेच सदर नेमणुकीमुळे कायम कर्मचाऱ्यांच्या सवलती किंवा कायम करण्यासाठी मागणी करण्याचा अधिकार राहणार नाही.

१४. पात्र उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१५. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

१६. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणूक/अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभूल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

१७. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

१८. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१९. विहित मुदतीत विहित नमुन्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमुना) अर्ज प्राप्त न झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

**(संजय शिंदे)**
उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ........................................................पदांचा सांकेतिक क्र. .................. )

प्रति,
**मा. उप-आयुक्त (सार्व. आरोग्य)**
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

फोटो

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | संपुर्ण नांव | : | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
| १. | **आडनांव** | : | .......................................... | .......................................... |
| २. | **स्वत:चे नांव** | : | .......................................... | .......................................... |
| ३. | **वडिलांचे/ पतीचे नांव** | : | .......................................... | .......................................... |

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ..........................................................................................

(३) **अ) जन्मतारीख** :

| **तारीख** | | **महिना** | | **वर्ष** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीची वय** ............................**वर्ष**............................**महिने**............**दिवस**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय/अभारतीय**

(५) **शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/ विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) गुणपत्रिका २) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) अनुभव कागदपत्रे

**अर्जदाराची सही/-**

**ठिकाण** :-
**दिनांक** :-